Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

# Current Global Reviewer

**UGC Approved International Research**
**Refereed Multidiciplanary Journal**

*Editor In Chief*
*Mr. Arun B. Gwodam*

**ISSUE IX Volume I ( Half Yearly) Jan. 2019**

**Editorial Office Address :**

Khadgaon Road, Kapil Nagar,
Latur, Dist. Latur 413512
(M.S.) India

Contact- 8149668999

Email-
hitechresearch11@gmail.com

**Publisher**
**Shaury Publication**
Kapil Nagar, Latur
Contact- 8149668999

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. ChittaRanjan Panda**
P.G. Deptt. OfOdia
Shailabala Women's
Autonomous College
**Cuttack – (Orissa)**

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**MaimanatJahanAra**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**Dr. Hanumant Mane**
R.Guide& Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**B.J. Hirve**
Dept. of botany
VasantMahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**Dr. PrainDiddeshwarShete**
Dept. of Zoology,
Maharashtra
UdaygiriMahavidyalaya,
Udgir,
Dist. Latur

**DrU.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist.Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
ShriBhausahebVartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr. N.J. Waghmare**
Research Guide & Head,
Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivani, (M.P. )

| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Phytochemical Analysis Of Roots Of *Asparagus racemosus* | Hirve Babasaheb Jalindarrao | 4 |
| 2 | Make In India: Challenges And Opportunities | Prof. Naval D. Patil | 7 |
| 3 | The Most Probable number (MPN) and index of borewell water From Jalna District of Maharashtra. | Kagne S.R. , Puri S.S. | 11 |
| 4 | The Performance Of Routing Protocols For Cellular Ad-Hoc Networks | Prof. Mane V. D. | 16 |
| 5 | Synthesis And Antimicrobial Activity Of 3-Aryl Substituted 5-Bromo -7-Ethoxy -1, 2, 4-Triazolo-[3, 4-*B*] Benzothiazoles By Oxidative Cyclisation | Smt. Shewale bharti vasantrao | 20 |
| 6 | The Theme of Casteism in the Recent Marathi Cinema with special reference to the movies *Fandry, Sairat and Khwada.* | Shuddhodhan P. Kamble | 28 |
| 7 | Theme of Moral Degradation in 'Midnight Woman' | Dr. KaradPrakash Desai | 32 |
| 8 | Organic Farming & Sustainable Agriculture Development | Mr .Pramod B. Deshmukh | 35 |
| 9 | बौद्ध स्तुप सांची : एक अध्ययन | डॉ. पाटील विनायक उध्दवराव | 41 |
| 10 | महाराष्ट्रातील मृदा प्रकारचा भौगोलिक अभ्यास | डॉ. सोनवने एस. व्यंकटराव | 47 |
| 11 | **आधुनिक हिंदी आत्मकथाओं में नारी विमर्श** | डॉ. शिवाजी एस. कदम | 54 |
| 12 | आधुनिक स्त्रीवादी कवितेमधील महिला अत्याचार विषयक विमर्श | **प्रा. गोरोबा शेषेराव रोडगे** | 59 |
| 13 | "अंतिम दशक के हिंदी उपन्यासों में नारी का 'प्रेममयी काम' रुप | कु.गीता शिवराज होकराणी पोस्ते | 63 |
| 14 | 'अण्णाभाऊ'च्या साहित्याचा समाजजीवनावरील परिजाम | प्रा. डॉ. भदाडे भारत भजवा-नराव | 66 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IXVol I , Jan. 2019 | Sr. No. 64310 | Impact Factor : 7.139

# आधुनिक स्त्रीवादी कवितेमधील महिला अत्याचार विषयक विमर्श

प्रा. गोरोबा शेषेराव रोडगे
मराठी विभाग प्रमुख, शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ,जि. लातूर

आधुनिक कवितेचा कल मुख्यत्वे वास्तववादी चित्रण करण्यावर भर देताना दिसतो. समाजातील वास्तवतेचे चित्रण करण्याच्या दृष्टीने आधुनिक काळातील साहित्याचा प्रवाह निर्माण झालेला दिसून येतो अलिकडच्या काळात विशेषत्वाने स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीयांच्या दुःखाचे, त्यांच्यावरील अन्यायाचे विदारक चित्रण अनेक कविंनी केलेले असल्याचे दिसून येते. यात त्यांनी स्त्री-पुरूष विषमता, विषम सामाकि स्थान, दर्जा, सामाजिक बंधने यांचा उहापोह केला आहे. या स्त्रीवादी साहित्यातून स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान, पुत्रजनमाचा गौरव, स्त्रीजन्माबाबतचे दुःख, प्रपंचातील कबाडकष्ट इत्यादी स्त्री दुःख, अन्यायाचे चित्रण करण्यात आले आहे. या साहित्याच्या माध्यमातून स्त्रियांची मानसिकता बदलणे हा हेतू अपेक्षित आहे. स्त्रियांच्याकडे पाहण्याचा समाजाने दृष्टीकोन बदलने अपेक्षित आहे. स्त्रिवादी साहित्याद्वारे समाजाला एक प्रकारे आरसा दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला दिसुन येतो. याच जाणिवातून स्त्रिवादी साहित्य चळवळ उदयास आली अशा साहित्याचा मागोवा घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधाची दिशा ठरविण्यात आली आहे.

**शोधनिबंधाचे उद्देशः**

१) आधुनिक स्त्रीवादी कवितेचा आढावा घेणे.

२) आधुनिक स्त्रीवादी कवितेमधील महिला अत्याचार विषयक विमर्शाचा अभ्यास करणे.

आधुनिक कवितेमधील स्त्री-वादी जाणीवा स्पष्ट करण्याचे कार्य कवियत्री ज्योती लांजेवार यांनी विशेषत्वाने केलेले दिसून येते. ज्योती लांजेवार यांनी आपल्या कवितेद्वारे स्त्री जाणिवांचा उहापोह केला आहे. आधुनिक काळात स्त्रीमुक्ती झाली आहे. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान आहे अशा प्रकारच्या चर्चा ऐकत असतो परंतु याबाबत लांजेवार म्हणतात महाभारत काळापासुन सुरू झालेले स्त्रियांचे वस्त्रहरण आधुनिक काळातही वेगवेगळ्या मार्गाने सुरू आहे. येथे वस्त्र पुरविणा-या हातांनी जर वस्त्रहरण करणा-याचे हात जर वेळीच छाटुन टाकले असते. तर आधुनिक काळात स्त्रियांचे होणारे शोषण थांबले असते. पण हे वस्त्र पुरविणारे हात संस्कृतीकडे गहाण आहेत. त्यामुळे स्त्रियांचे सबलीकरण होऊ घातलेल्या युगात आणि स्त्री-मुक्तीच्या युगातही दलित स्त्रियांचे भर रस्त्यात वस्त्रहरण करून तिची विटंबणा केली जात आहे. अशा प्रकारचे दुःख, अन्याय, लाजिरवाण जिणं स्त्रियांच्या वाट्याला येत आहे. त्याबाबतचे चित्रण त्यांनी आपल्या कवितेद्वारे करण्याचा प्रयत्न कला आहे.

हर युगात, तुझे वस्त्रहरण
निमित्त वेगवेगळे, वस्त्र पुरविणारे हात

संस्कृतीकडे गहाण, तुझी थोरवी
स्वर्गाहून महान!

अशा प्रकारचे स्त्रियाच्या व्यथांचे, समस्यांचे आधुनिक परिस्थितीतील स्त्री प्रश्नांचे चित्रण त्यांनी आपल्या कवितेद्वारे मांडले आहे. त्यांनी आपल्या कवितेद्वारे महाभारतातील द्रोपदीप्रमाणेच आजच्या स्त्रियांची अवस्था असल्याचे चित्रण मांडले आहे. त्यांनी पुढे स्त्री अन्यायाचे वर्णन करतांना म्हटले आहे की,

माझ्या डोळ्यापुढे सतत उभी असते
कौरवाच्या राज्यसभेत बेअब्रु होणारी पांचाली!

त्यांच्या मते आजही सतत बेअब्रु होणा-या स्त्रिया जणु डोळ्यासमोर पांचाली, द्रोपदीच्या बेअब्रुचे पुर्नचित्रण प्रस्तुत करतांना दिसत असतात. महाभारत कालीन द्रोपदीची अब्रु श्रीकृष्णाच्या माध्यमातून वाचली परंतु आधुनिक काळात अशा स्त्री व्यथांची समस्यांची दखल घेणारा श्रीकृष्ण अस्तित्वात नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.

स्त्री मुक्ती चळवळीने १९८० च्या दशकात स्त्रियांवर कुटुंबातून होणारे अत्याचार, हुंडाबळी, बलात्कार या व अशा अनेक अन्यायाच्या विरोधात करण्यात आलेली आंदोलने विशेष चर्चीली गेली स्त्रियांवर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्याचे महत्त्वाचे काम या आंदोलनामुळे झाले. त्याचे पडसाद आधुनिक कवितेद्वारे उमटण्यास सुरूवात झाली. प्रतिमा इंगोले यांच्या कवितेतील कष्टकरी आई तिच्या मुलीला सासरी त्रास देणा-या जावायाला खडसावून सांगण्यास मागे पुढे न पाहता स्पष्टपणे सांगते.

बस झालं, जुळुन होत नाही सईन.
पोटी सपादली तशी आता ताटी सपादिन.
दोन कष्ट करीन भरीन अन सुखान खाईन.
अखरीच सांगतो.
खुशाल पलटुन जा
राखीन जसा चवथा लेक आमचा!

अशाप्रकारे कष्ट उपसणा-या आईने आपल्या पोटच्या लेकीस होणा-या जाचाचा, त्रासाचा समाचार घेतला आहे. या कवितेतून आपल्या लेकीस होणा-या त्रासामुळे लेकाप्रमाणे सांभाळ करण्याचे स्पष्ट करते परंतु आपल्या कष्टाचा विचार न करता आपल्या लेकीच्या वाट्यास आलेले अन्याय, अत्याचार सहन न करण्याचे स्पष्ट करते. या कवितेतील एक स्त्री समाजबंधने, समाजपरंपरा, अप्रतिष्ठा झुगारुन लेकीच्या, स्त्रिच्या अन्यायास वाचा फोडण्याचे काम करतांना दिसून येते. अशाच प्रकारच्या स्त्रियांच्या समस्यांचा, प्रश्नाचा उहापोह. 'कमावत्या स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य आहे का?'या कवितेद्वारे परूळेकर यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

स्वत:च्या श्रमाने कमावलेला पगार
तोही हातात द्यायचा पुरूषाच्या निमुटपणे
हे आर्थिक स्वातंत्र्य
आणि अनेक स्त्रिया अनुभवने

ही पुरूषांची प्रतिष्ठा !

अशा प्रकारची स्त्रियांची व्यथांचे विशेषतः कमावत्या स्त्रियांची आर्थिक, सामाजिक परिस्थितीचे विदारक चित्रण परूळेकर यांनी आपल्या कवितेद्वारे मांडले आहे. त्यानी आपल्या कवितेद्वारे स्त्रीयांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या मर्यादा, पुरूषसत्ताक पद्धतीमधील स्त्रियांच्या समस्या किती गहन आहेत याचे चित्रण आपल्या कवितेद्वारे मांडले आहे. आधुनिक कवितेमधील स्त्रीवादी जाणिवा, अनेक कविनी स्पष्टपणे मांडल्या आहेत. यात प्रामुख्याने प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या कवितेतून राजस्थानमधील रूपकुंवरची व्यथा १९९० च्या दशकात व्यक्त केली आहे त्यानी १९ व्या शतकातील स्त्रीवर लादलेल्या अनेक अनिष्ट रूढी-परंपरांबाबत मत प्रदर्शित केले आहे.

स्त्रीत्वाचा मुक आक्रोश सजवण्यात
धन्य झालेली आपली संस्कृती आणि
जोहारपासून सतीपर्यंतचा प्रवास
एक्किसवी सदीत तुसभरही
बदल नाही रूपकुंवर !

लोखंडे यांनी आपल्या या कवितेद्वारे स्त्री शरीराच्या पावित्र्याला-शुचितेला महत्त्व देऊन तीला अंकित करू पाहणारि पुरूषसत्ताकेंद्री संस्कृती एकविसाव्या शतकातही पाय रोवून उभीच असल्याचे भाष्य केलेले आहे. त्यानी आपल्या कवितेद्वारे १९ व्या शतकातील केशवपन, सतीची प्रथा, बालविवाह इत्यादी कुप्रथाचा उहापोह त्यांनी मांडला आहे.

**समारोप :**

आधुनिक कालखंडात स्त्रीवाद, स्त्रीवादी साहित्य, महिला सक्षमीकरण, महिला मुक्तीचळवळ अशा नवीन संकल्पनांची चर्चा होऊ लागली आहे. या माध्यमातून नवीन अध्ययनाचे क्षेत्र उपलब्ध झालेले आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विशेषत्वाने स्त्रीवाद, स्त्रिवादी साहित्याचा उहापोह होऊ लागला. हा उहापोह होण्याची कारणे अनेक आहेत. त्यापैकी एक महत्त्वपूर्ण कारण म्हणजे समाजाने महिलांना दिलेले दुय्यम स्थान होय. समाजरूपी रथाची दोन चाके असा ज्याचा उल्लेख केला जातो ते दोन घटक म्हणजे पुरुष आणि स्त्रिया हे आहेत. यापैकी स्त्रियांना समाजात दुय्यम स्वरूपाचे स्थान देण्यात आले होते. परंतु आधुनिक कालखंडात स्त्रियांना पुरूषाप्रमाणेच समानतेचे स्थान देणे क्रमप्राप्त समजण्यात येऊ लागले. त्यातूनच स्त्रीवादाच्या संकल्पनेचा उदय झाला. याच कारणातून पुढे स्त्रीवादी साहित्यातून स्त्रियांवर झालेल्या, होणा-या अत्याचाराचे चित्रण साहित्यातून करण्यात येवू लागले.स्त्री जन्म धारण करणा-या प्रत्येक स्त्रीला जीवनात मुलगी, पत्नी, आई, सुन, सासू अशा भूमिकेतून जीवन व्यतीत करावे लागते. मुलगी असताना वडीलांच्या छत्रछायेत, तरूणपणी पतीच्या सहवासात, पतीच्या आधाराने तर जीवनाच्या उत्तरार्धात पुत्राच्या आधाराने जीवन जगावे लागते. जीवन जगताना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. आपले जीवन केवळ त्याग आणि समर्पणाच्या भावनेतून जगावे लागते याच कारणातून पुढे स्त्रियांना गुलामगिरीच्या खाईत ढकलण्यात आले.

**संदर्भ सूची :**

१) डॉ. अश्विनी धोंगडे (संपा.), भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृ.२४५.

२) डॉ. सदाशिव सरकटे, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१६९.

३) प्रा. रूपाली शिंदे, मराठी स्त्री काव्यातील स्त्रीवादी जाणिवाचा अविष्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृ.२४४.

४) ज्योती लांजेवार, दिशा, निखील प्रकाशन, नागपुर, पृ.७.

५) ज्योती लांजेवार, दिशा, निखील प्रकाशन, नागपुर, पृ.१०.

# Current Global Reviewer



ISSN 2319-8648

Peer Reviewed

Impact Factor - 7.139

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648


Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur

Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in